**राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान**
**प्रकल्प अंमलबजावणी आराखडा यानुसार महानगरपालिका क्षेत्रात गरीब जनतेस आरोग्य सेवा पुरविण्याकरीता "आपला दवाखाना" प्रकल्पाअंतर्गत १०० "आदरणीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" केंद्रे कार्यान्वित करण्यासाठी ई-निविदा प्रक्रीयेद्वारे बाह्य संस्था निश्चित करण्याच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत..**

# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

**शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-१२२०/प्र.क्र.३६/आरोग्य -७**

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : ०४ जानेवारी, २०२१.

**वाचा :-**

१) शासन निर्णय,सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक प्रशामा २०१९/प्र.क्र.१६८-अ/आरोग्य-७, दिनांक १६.०७.२०१९.
२) अतिरिक्त अभियान संचालक,राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान,मुंबई यांचे पत्र क्र.राआआ/रानाआअ/आपला दवाखाना प्र.मा./२९९८८-९३/२०२०-२१, दिनांक २८.०७.२०२०.
३) अतिरिक्त अभियान संचालक,राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान,मुंबई यांचे पत्र क्र.राआआ/रानाआअ/आपला दवाखाना प्र.मा./६७८५०-८५१/२०२०-२१, दिनांक २३.१०.२०२०.

**प्रस्तावना :-**

उपरोक्त वाचा येथील क्र.१ येथील शासन निर्णयान्वये राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात गरीब जनतेस आरोग्य सेवा पुरविण्याकरीता "आपला दवाखाना" प्रकल्पाअंतर्गत ६० "आदरणीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" केंद्रे कार्यान्वित करण्यासाठी ई-निविदा प्रक्रीयेद्वारे बाह्य संस्था निश्चित करणेसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापि, या संदर्भातील निविदा प्रक्रीयेअंती प्राप्त झालेले निविदाधारक तांत्रिक छाननी अंती अपात्र ठरल्यामुळे उपरोक्त संदर्भ क्र,२ व ३ अन्वये अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान यांनी महानगरपालिका दाट झोपडपट्टी क्षेत्रात गरीब जनतेस आरोग्य सेवा पुरविण्याकरीता "आपला दवाखाना" प्रकल्पाअंतर्गत १०० "आदरणीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" केंद्रे कार्यान्वित करण्यासाठी ई-निविदा प्रक्रीयेद्वारे बाह्य संस्था निश्चित करणे व त्या साठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

**शासन निर्णय :-**

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र,प्रशामा २०१९/प्र.क्र.१६८-अ/आरोग्य-७, दिनांक १६.०७.२०१९ अन्वये या प्रकल्प अंतर्गत ६० ठिकाणी आदरणीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कार्यान्वित करण्यासाठी ई निविदा प्रक्रिया मार्फत बाह्य संस्था निश्चित करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. परंतु अतिरिक्त अभियान संचालक यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे सदर निविदा प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. शासकीय खरेदी धोरणातील तरतूद क्र २.१३ अनुसार प्रशासकीय मान्यतेचे आदेश मान्यतेच्या दिनांकापासून एक वर्षापर्यंतच ग्राह्य असतात. एक वर्षाच्या कालावधीनंतर नव्याने आदेश काढावे लागतात. सबब प्रस्तुत प्रकरणी दिनांक १६.०७.२०१९ चा शासन निर्णय व्यपगत झाल्याने नव्याने प्रशासाकीय मान्यता देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**०२.** राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखडा FMR Code १८.१.५ व सन २०१९-२० च्या आराखड्यातील FMR Code १८.८ अंतर्गत मंजूर व वचनबद्ध ठेवण्यात आलेल्या तरतुदीमधून सोबत जोडलेल्या (परिशिष्ट) १९ महानगरपालिका क्षेत्रात गरीब जनतेस आरोग्य सेवा पुरविण्याकरीता “आपला दवाखाना” प्रकल्पाअंतर्गत १०० “आदरणीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना” केंद्रे कार्यान्वित करण्यासाठी ई-निविदा प्रक्रीयेद्वारे बाह्य संस्था निश्चित करणे व त्या साठी येणाऱ्या अंदाजे रु.७९५.०० लक्ष एवढ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

०३. **प्रस्तावित योजनेसाठी खर्चाचा तपशील**

- १०० दवाखान्यांसाठी प्रति दवाखाना भांडवली खर्च रु.एक लक्ष व आवर्ती खर्च रु.६.९५ लक्ष मिळून प्रति दवाखाना रु.७.९५ लक्ष या प्रमाणे १०० दवाखान्यांसाठी रु.७९५ लक्ष एवढा खर्च अपेक्षित.
- **भांडवली खर्चात पुढील बाबींचा समावेश**.:-

  पायाभूत सुविधा - रु.एक लाख प्रति दवाखाना या प्रमाणे १०० दवाखान्यांसाठी रु.१०० लक्ष.

  **एकूण भांडवली खर्च रु.१००.०० लक्ष.**

- **आवर्ती खर्चात पुढील बाबींचा समावेश**.

| तपशील | एका दवाखान्याचा खर्च (रु.लक्ष) | एकूण खर्च (रु.लक्ष) |
|---|---|---|
| वैद्यकीय अधिकारी | ४.५ | ४५०.०० |
| माहिती तंत्रज्ञान | ०.७५ | ७५.०० |
| औषधे | १.०० | १००.०० |
| माहिती शिक्षण व संवाद | ०.१० | १०.०० |

| तपशील | एका दवाखान्याचा खर्च (रु.लक्ष) | एकूण खर्च (रु.लक्ष) |
|---|---|---|
| कार्यात्मक खर्च (Operational Expenses) | ०.६० | ६०.०० |
| **एकूण आवर्ती खर्च** | **६.९५** | **६९५.००** |

<u>**वित्तीय तरतूद**</u>

| **अ.क्र.** | FMR Code | **लेखाशीर्ष** | **मंजूर कृती आराखडा** | **मंजूर निधी.** |
|---|---|---|---|---|
| १. | U १८.१.५ | आपला दवाखाना प्रकल्प | २०२०-२१ | रु.७३५.०० लक्ष |
| २. | U १८.८ | वरीलप्रमाणे | सन २०१९-२० मधील वचनबद्ध निधी | रु.६६.०० लक्ष |
| | | | **एकूण मंजूर व उपलब्ध निधी.** | **रु.८०१.०० लक्ष.** |

**०४.** सदर प्रशासकीय मान्यता ही खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.:-

१. सदर प्रकल्पासाठी निविदा प्रक्रीयेंती नियुक्त करण्यात येणारी बाह्य संस्था ज्या ठिकाणी आदरणीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कार्यान्वित करेल त्या ठिकाणी मनुष्यबळ, औषध वितरण यंत्रणा (Medicine Vending Machine) व संगणक प्रणालीसाठी (IT) आवश्यक ते Hardware/Software उपलब्ध करून देईल. निविदा प्रक्रीयेंअंती पात्र सेवा पुरवठादार दवाखान्यातील संपूर्ण सेवा (बाह्य रुग्ण सेवेसह)जनतेला पुरवेल.यासाठी आवश्यक भांडवली गुंतवणूक,वैद्यकीय उपकरणे,वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, इतर सहायभूत कर्मचारी (ANM/GNM),स्तरावरील कर्मचारी व दैनंदिन व्यवस्थापनासाठी सहायक केंद्रे इत्यादींची व्यवस्था करेल. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत दिवसाला रुग्णसंख्येप्रमाणे सल्ला शुल्क (Consulting Charges) सेवा पुरवठादारास अदा करण्यात येईल.

२. सदर सेवेबाबत आवश्यकता /मागणी याची शहानिशा/खातरजमा अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई यांनी करूनच सोबत जोडलेल्या यादीत नमूद मनपामध्ये आदरणीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना केंद्रे कुठे कार्यान्वित करावयाची आहेत हे निश्चित करूनच निविदा प्रक्रिया राबवावी.

३. शासन निर्णय,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग -३/उद्योग-४,दिनांक ०१.१२.२०१६ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची सुधारित नियमपुस्तिका यामधील तरतुदीनुसार विहित निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

४. प्रकल्प अंमलबजावणी आराखडयामधील विनिर्देश तसेच शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.प्रशामा-२०१९/प्र.क्र.१६८/आरोग्य-७, दिनांक १६.०७.२०१९ च्या प्रशासकीय

मान्यतेनुसार असफल निविदा प्रक्रियेतील त्रुटींचे निराकरण करुनच सुधारित निविदा प्रसिध्द करण्याची दक्षता कार्यक्रम प्रमुखांनी घ्यावी.

तसेच सदरहू बाबींचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी.सदरहू बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical Specifications) संबंधित तज्ञांनी ( तांत्रिक समिती/अधिकारी)यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसारच असावेत तसेच सदर तांत्रिक विनिर्देश हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला /संस्थेला फायदा होईल अशा रीतीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यात मंजूर असलेल्या बाबींच्या तांत्रिक विनिर्देशानुसार मागणीपत्र पाठविण्याची जबाबदारी संबंधित कार्यक्रम प्रमुखांची राहील.प्रस्तावात समाविष्ट असलेल्या बाबींवरच निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

५. प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित बाबींचे दर हे अंदाजित आहेत त्यामुळे निविदा प्रक्रीयेअंती दर निश्चित करण्यात यावेत.सदर दर हे बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबींचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे ,त्या दरांपेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

६. सदरहू बाबींसाठी होणारा खर्च हा प्रकल्प अंमलबजावणी आराखडा २०१९-२० मधील FMR Code U १८.८ मधील वचनबद्ध ठेवण्यात आलेल्या रु.६६ लक्ष सन २०२०-२१ च्या मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यातील FMR Code U १८.१.५ मधील रु.७३५.०० लक्ष मिळून एकूण मंजूर तरतूद रु.८०१.०० लक्ष ह्या अनुदानातून भागविण्यात यावा. सदरची निविदा प्रक्रिया प्रशासकीय मंजुरीच्या विहित कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

७. तसेच या बाबींची द्विरुक्ती (Duplication) होणार नाही याची दक्षता घ्यावी.

८. संपूर्ण निविदा प्रक्रिया राबविताना केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

९. शासन निर्णय,वित्त विभाग,क्र.विअप्र २०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनिमय,दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८,भाग पहिला,उपविभाग-२ मधील अ.क्र.४,नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

१०.निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यावर खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.

०४. उपरोक्त अनुक्रमांक १ ते ११ येथील अटींची पूर्तता व खरेदी नियमानुसार व आवश्यकतेनुसार आहे हे सुनिश्चित करण्याची जबाबदारी आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई व सम्बन्धित कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

०५. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र २०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनिमय, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८,भाग पहिला,उपविभाग-२ मधील अ.क्र.४, नियम क्र.७ अन्वये अवजारे, किरकोळ साधन सामुग्री आणि उपक्रम संच विकत घेण्यास मंजुरी देण्यासाठी प्रशासनिक विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०१०४१२३३२७४८१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Milind Raghunath Kulkarni

Digitally signed by Milind Raghunath Kulkarni
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=438fa70bb728385b5c81bde24450c11d5ce0d99ed18a61fb5b1685722e2c2c03, cn=Milind Raghunath Kulkarni
Date: 2021.01.04 14:56:44 +05'30'

**( मिलिंद कुळकर्णी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. आयुक्त,आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालक,मुंबई,
२. अतिरिक्त अभियान संचालक,राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान,मुंबई
३. संचालक,आरोग्यसेवा १ व २,मुंबई व पुणे
४. संचालक (वित्त व लेखा),राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई,
५. **सर्व संबंधित महानगरपालिका आयुक्त** ( बृहन्मुंबई मनपा,ठाणे मनपा,वसई-विरार शहर मनपा, कल्याण-डोंबिवली मनपा, नवी मुंबई मनपा, मीरा भाईंदर मनपा, भिवंडी-निजामपूर मनपा, उल्हासनगर मनपा, पनवेल मनपा, नागपूर मनपा, चंद्रपूर मनपा, नाशिक मनपा, मालेगाव मनपा, धुळे मनपा, कोल्हापूर मनपा, सांगली-मिरज-कुपवाड मनपा, अमरावती मनपा, औरंगाबाद मनपा व लातूर मनपा)
६. अतिरिक्त संचालक,राज्य कुटुंब कल्याण कार्यालय,पुणे,
७. सर्व सहसंचालक (आरोग्य सेवा आयुक्तालयामार्फत)
८. उपसंचालक,सर्व मंडळ कार्यालये,
९. सर्व संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
१०.सर्व संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
११. निवड नस्ती (कार्यासन-आरोग्य-७).

# परिशिष्ट

## "आदरणीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" केंद्रे कार्यान्वित करण्यात येणाऱ्या महानगरपालिकांची यादी

| Sr No | District | Name of Municipal Corporation | Total Population | Slum Population | Vulnerable Population | Slum Pockets | Aapla Dawakhana Porposed in PIP 2019-20 | Aapla Dawakhana Porposed in PIP 2020-21 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Amravati | Amravati | 647057 | 216000 | 12935 | 121 | 5 | 0 |
| 2 | Aurangabad | Aurangabad | 1175116 | 490000 | 200000 | 171 | 0 | 5 |
| 3 | Latur | Latur | 382940 | 150000 | 75900 | 77 | 5 | 0 |
| 4 | Mumbai | Mumbai (MCGM) | 12432830 | 7357922 | 119748 | 1738 | 5 | 0 |
| 5 | Thane | Thane | 1841488 | 1228817 | 1228817 | 180 | 10 | 0 |
| 6 | | Vasai Virar City | 1722108 | 750520 | 55341 | 133 | 4 | 0 |
| 7 | | Kalyan Dombiwali | 1247327 | 849288 | 65261 | 74 | 5 | 0 |
| 8 | | Navi Mumbai | 1120547 | 533000 | 324222 | 99 | 0 | 5 |
| 9 | | Mira Bhaindar | 809378 | 142516 | 81465 | 63 | 5 | 0 |
| 10 | | Bhivandi Nijampur | 709665 | 597558 | 0 | 14 | 0 | 5 |
| 11 | | Ulhasnagar | 506098 | 275044 | 7037 | 130 | 5 | 0 |
| 12 | Raigad | Panvel | 180020 | 10947 | 906 | 12 | 0 | 5 |
| 13 | Nagpur | Nagpur | 2405665 | 900000 | 199021 | 446 | 5 | 0 |
| 14 | Chandrapur | Chandrapur | 320379 | 115914 | 24810 | 80 | 5 | 0 |
| 15 | Nashik | Nashik | 1486053 | 276625 | 186160 | 146 | 6 | 0 |

| Sr No | District | Name of Municipal Corporation | Total Population | Slum Population | Vulnerable Population | Slum Pockets | Aapla Dawakhana Porposed in PIP 2019-20 | Aapla Dawakhana Porposed in PIP 2020-21 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 16 | | Malegaon | 611228 | 377650 | 215781 | 127 | 0 | 5 |
| 17 | Dhule | Dhule | 375559 | 63000 | 5518 | 57 | 0 | 5 |
| 18 | Kolhapur | Kolhapur | 549283 | 201385 | 1826 | 54 | 0 | 5 |
| 19 | Sangli | Sangli Miraj Kupwad | 502793 | 188064 | 10281 | 99 | 0 | 5 |
| **Total** | | | **29025534** | **14724250** | **2815029** | **3821** | **60** | **40** |
| **List may change subject to availability of Space from corporation** | | | | | | | | |